सन २०२५-२६ करिता निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या राज्य योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/फ-९**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०२६

**वाचा :-**

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०८.१०.२०२५
३. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/वने-९ दि.२१.०४.२०२५
४. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.२८.०५.२०२५
५. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.१६.०७.२०२५
६. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.२६.०९.२०२५
७. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.२९.०९.२०२५
८. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.१३.१०.२०२५
९. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.३१.१०.२०२५
१०. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/ वने -९, दि.१२.१२.२०२५
११. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/३४६/२०२५-२६, दि.०९.०७.२०२५
१२. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/५९७/२०२५-२६, दि.१६.०९.२०२५
१३. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/७८५/२०२५-२६, दिनांक ३१.१०.२०२५
१४. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/९५९/२०२५-२६, दिनांक ११.१२.२०२५.
१५. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/९७९/२०२५-२६, दिनांक १४.१२.२०२५.
१६. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/९८४/२०२५-२६, दिनांक १५.१२.२०२५.
१७. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/११०५/२०२५-२६, दिनांक २२.०१.२०२६.
१८. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/११७९/२०२५-२६, दिनांक १०.०२.२०२६.
१९. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/११९१/२०२५-२६, दिनांक १२.०२.२०२६.
२०. अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.०९/१२२२/२०२५-२६, दिनांक २०.०२.२०२६.

**प्रस्तावना :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत रुपये २००००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित आहे. त्यानुषंगाने वाचा क्र.३ ते १० येथील शासन निर्णयान्वये उपशिर्षनिहाय एकूण रु. ११६३१.६० लक्ष इतके अनुदान वितरित करण्यात आले आहे.

वित्त विभागाच्या वाचा येथील क्र.१ च्या परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यानंतर विभागास सन २०२५-२६ च्या प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२५ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतुदीच्या ६०% च्या मर्यादेत तसेच १) आमदार स्थानिक कार्यक्रम निधी २) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण/अनुसूचित जाती घटक कार्यक्रम/आदिवासी घटक कार्यक्रम) यासाठी प्रथम नऊमाहीकरीता (डिसेंबर, २०२५ अखेर) ६० टक्केच्या मर्यादेत आणि परिच्छेद क्र.२ अ) नुसार केंद्र पुरस्कृत योजनेतील केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा १००% च्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) वितरीत करण्याच्या अनुषंगाने सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर मासिक विवरणपत्रानुसार निधी एप्रिल ते डिसेंबर, २०२५ या कालावधीमध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) देण्यात आली आहे. निधी वितरीत करताना मासिक निधी विवरणपत्रात (Cash Flow Statement) ज्या दरमहा खर्च रकमा दर्शविण्यात आलेल्या आहेत त्याच्याशी सुसंगत असाव्यात, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या उद्दीष्टाकरीता प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी याबाबतचे प्रस्ताव ठोस समर्थनासह आवश्यकतेनुसार नियोजन विभागामार्फत वित्त विभागास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, वित्त विभागाच्या वाचा येथील क्र.०२ च्या परिपत्रकान्वये कार्यक्रमांतर्गत खर्चाबाबतचे अर्थसंकल्पीय निधी वितरणाचे प्रस्ताव तसेच कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या पूरक मागणीच्या निधी वितरणाचे प्रस्ताव यापुढे थेट वित्त विभागास सादर करण्यात यावेत, अशा सूचना दिलेल्या आहेत.

वित्त विभागाचे वाचा क्र.१ व २ येथील नमूद परिपत्रकानुसार सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या वाचा क्र. ११ ते १९ येथील नमूद पत्रान्वये प्राप्त झालेल्या निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत चालू बाब प्रस्तावास अनुसरून BDS प्रणालीवर अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून वाचा क्र.११ ते २० येथील नमूद पत्रान्वये प्राप्त झालेले प्रस्ताव तसेच वित्त विभागाचे वाचा क्र.१ व २ येथील नमूद परिपत्रकानुसार बीम्स प्रणालीवर उपलब्ध निधी विचारात घेता, प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास (२४०६ २२९५) या योजनेतून सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रामधील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन स्थळाकरीता ०२- मजुरी अंतर्गत रु. १३११.०० लक्ष, २१-साहित्य पुरवठा अंतर्गत रु. ४५६.०० लक्ष, २७-लहान बांधकामे अंतर्गत रु. ११००.०० लक्ष व ५०-इतर खर्च अंतर्गत रु. ७८.०० लक्ष असा असा उपशिर्षनिहाय एकूण रु.२९४५.०० लक्ष इतका निधी खालील अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

२. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर योजनांतर्गत वाचा येथील क्र.११ ते २० येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावातील वनवृत्ताच्या प्रपत्र-ब मध्ये प्रस्तावित केलेल्या कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच उपशिर्षनिहाय सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कोणतीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

६. नियंत्रक अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येते की, एकूण वितरीत केलेल्या/करण्यात येणाऱ्या तरतूदीपेक्षा कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

७. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

८. अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरीत करण्यापूर्वी तसेच खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील तरतूदी व सर्व अटी/शर्तीचे पालन करावे.

९. सदर आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मंजूर व वितरीत अनुदानाच्या मर्यादेत खर्च सिमीत ठेवावा.

१०. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शिर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

११. संस्थेने मागील वर्षाकरिता त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र शासनास तसेच महालेखापालांना तात्काळ सादर करावे. त्याचप्रमाणे, आता वितरित करण्यात येत असलेल्या अनुदानाचे तपशिलवार देयक व विनियोग प्रमाणपत्र देखिल (Utilization Certificate) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२ नागपूर व शासनाला तातडीने सादर करावे.

१२. उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर यांना राहतील व त्याकरीता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

१३. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०७.०४.२०२५ व ०८.१०.२०२५ रोजीचे परिपत्रकातील अटींची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

१४. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१५. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही, याची सुध्दा दक्षता घ्यावी.

१६. केंद्र शासन व राज्य शासनाचे निसर्ग पर्यटन धोरणाशी अनुकूल राहतील अशीच कामे कार्यान्वित करावी.

१७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलच्या कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

१८. कामांची अंमलबजावणी करताना कामांचे एकत्रीकरण करुन नियमानुसार ई-निविदा प्रणाली अवलंबण्याची दक्षता घ्यावी.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक-सी-०७ प्रधान शिर्ष- २४०६, वनिकरण व वन्यजीवन, पंचवार्षिक योजनांतर्गत, राज्य योजनांतर्गत योजना (०२) (०६) इको टुरिझम (राज्य) (२४०६-२२९५) या लेखाशिर्षांतर्गत सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.क्र. १५०/व्यय-१०, दि. ०५.०२.२०२६ अन्वये तसेच वित्त विभाग दिनांक ०७.०४.२०२५ व दिनांक ०८.१०.२०२५ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाच्या शासन निर्णय

क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२२७१३२४४९९०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UDAY CHANDRAKANT DHAGE

Digitally signed by UDAY CHANDRAKANT DHAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=d50c7e8b1126d276bbe49105f9d24fff67dc9032e4afab15f5d0d94a0ea6cf5a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=097E903F6E5707A0A9A3CDAEBE40C9235E8FDA1EE2C8C4EA7713D6497937DCED, cn=UDAY CHANDRAKANT DHAGE
Date: 2026.02.27 13:27:19 +05'30'

**( उदय ढगे )**
**विशेष कार्य अधिकारी**
**महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व, नागपूर
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
५. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे/कोल्हापूर/चंद्रपूर/नाशिक/पुणे.
६. वनसंरक्षक (प्रा.) पुणे/धुळे
७. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८. सह सचिव/उपसचिव,वित्त विभाग (अर्थ-३)/(व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
९. उप सचिव, नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, वने-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन वने-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

********

महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.४३/फ-९, दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२६ सोबतचे विवरणपत्र.

**(रु. लक्ष)**

| अ. क्र. | **निसर्ग पर्यटन स्थळांचे क्षेत्र** | **प्रस्तावाची रक्कम** | **वितरणासाठी प्रस्तावित** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ०२-मजुरी | २१-पुरवठा व सामग्री | २७-लहान बांधकामे | ५०-इतर खर्च | एकूण |
| १ | मौजे सादागड (रिंगदेव) येथे पर्यटन सफारी | २०३.१८ | ३५.४१ | ०.०० | ०.०० | ०.०० | ३५.४१ |
| २ | बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा | ९६७.५० | ५०.०० | ५०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ३ | धन्नुर तलावाचे सौंदर्यीकरण | २२९.८३ | ४०.०० | २०.०० | ६५.०० | ०.०० | १२५.०० |
| ४ | मौजे सालोड (हिरापूर) | १३१८.४२ | ५०.०० | ०.०० | ५०.०० | ०.०० | १००.०० |
| ५ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली (मिनी ट्रेन) | ४२५.०४ | ७४.०८ | ९७.९३ | २३६.२४ | १६.७९ | ४२५.०४ |
| ६ | अनेरडॅम, अभयारण्य | १४३६.४६ | २००.०० | ०.०० | १००.०० | ०.०० | ३००.०० |
| ७ | उनपदेव येथे वनउद्यान | २४८.९८ | ४३.४० | ५७.३६ | १३८.३८ | ९.८३ | २४८.९७ |
| ८ | मोहिदा निसर्ग पर्यटन स्थळ | ३३४.९२ | ४१.५२ | ५४.८९ | १३२.४१ | ९.४१ | २३८.२३ |
| ९ | मौजे मोरेकुरण येथे इको पार्क वनउद्यान (पालघर सिटी) | ४४२५.६७ | ३००.०० | ०.०० | २००.०० | ०.०० | ५००.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर (बफर) | ११६६.६५ | १००.०० | २०.०० | ८०.०० | ०.०० | २००.०० |
| ११ | मौजे सादागड (रिंगदेव) येथे पर्यटन सफारी | ७०.३९ | १२.२७ | १६.२२ | ३९.१२ | २.७८ | ७०.३९ |
| १२ | पंचमुखी हनुमान टेकडी बाबुलखेडा | ३१५५.९५ | ३२३.३० | ८५.३८ | ५८.८५ | ३२.४७ | ५००.०० |
| १३ | साकोली येथे जैवविविधता वनउद्यान- | २३५.३३ | ४१.०२ | ५४.२२ | ०.०० | ६.७२ | १०१.९६ |
| | **एकूण** | **१४२१८.३२** | **१३११.००** | **४५६.००** | **११००.००** | **७८.००** | **२९४५.००** |

*******